२४९ २५९ २४८

**परिपत्रक :**

क्रमांक : कॉन/ ए-३/ ह.प्र.नोंदणी /२००२
पुणे, दिनांक : / १०/ २००२
30 OCT 2002

**विषय :- जमीन एकत्रीकरण योजना.**
**हस्तांतरण प्रमाण पत्र नोंदणी बाबत.**

माझे असे निदर्शनास आले आहे की, मंजूर एकत्रीकरण योजनेच्या अनुसरण कामामध्ये शिलकी हस्तांतरण प्रमाणपत्राचे नोंदणीकामी, नोंदणी विभागाकडून त्रृटया काढून, सदरची हस्तांतरण प्रमाणपत्रे परत पाठविली जातात. या बाबत उपसंचालक भूमि अभिलेख,औरंगाबाद आणि अधिक्षक भूमि अभिलेख,रायगड मु.अलिबाग यांनी दि. १०/१०/२००२ चे सभेत आणि लेखी स्वरुपात जे मुददे उपस्थित केले आहेत ते खालिलप्रमाणे आहेत.

१) शासनाचे महसूल व वन विभागाकडील अधिसूचना क्र.आर.जी.एन.-२००१ /२८८५/सी.आर.६१२/एम-१ दिनांक २८/१२/२००१ अन्वये दस्त नोंदणीसाठी प्रति पान- रु.२०/- इतकी रक्कम " दस्त हाताळणी शुल्क " म्हणून वसूल करणे आवश्यक आहे.

२) हस्तांतरण प्रमाण पत्र नोंदणीचे वेळी, खातेदार उपस्थित राहणे आवश्यक आहे.

३) हस्तांतरण प्रमाणपत्रे छापील नमून्यात असल्यामुळे, त्याच्या दोन सुस्पष्ट झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.

२/- वरील मुद्यांपैकी मुददा क्र.(१) ची पुर्तता, कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे कडे उपलब्ध असलेल्या " आकस्मीक खर्चाचे अनुदानामधून " करावी. ज्या कार्यालय प्रमुखाकडे जास्त हस्तांतरण प्रमाणपत्रे, नोंदणी करणेवर शिल्लक आहेत त्यांनी, त्या प्रमाणात सन २००२-२००३ चे नऊ माही अंदाजपत्रकात विशेष आर्थिक तरतुद करावी व अनुदान मिळाल्यानंतरच हस्तांतरण प्रमाण पत्रांचे नोंदणीकाम पूर्ण करावे. कारण मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे बाबत व त्यांचे एकत्रीकरण करणे बाबत अधिनियम १९४७ मधील कलम २४(२) अन्वये " दस्त हाताळणी शुल्क " (प्रति पान रु.२०/-) हे संबंधीत खातेदाराकडून वसूल करता येणार नाही.

३/- परिच्छेद-१ मधील मुददा क्र.(२) हा कायदेशीर दृष्टया उचित नाही. कारण ज्याअर्थी मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणेबाबत व त्यांचे - एकत्रीकरण करणे बाबत अधिनियम १९४७ मधील कलम २४(१) अन्वये,"एकत्रीकरण अधिका-याने एकत्रीकरण योजनेनुसार ज्यास धारण जमीन देण्यात आली आहे अशा प्रत्येक

(कृ.मा.प.)

मालकास आणि कलम २१ चे पोट कलम (६) अन्वये जिला हक्क देण्यात आला आहे अशा प्रत्येक व्यक्तीस, योजनेनुसार धारण जमिनींचे हस्तांतरण तिच्याकडे करण्यात आले आहे अशा अर्थाचे प्रमाणपत्र विहित केलेल्या नमुन्यामध्ये दिले पाहिजे व असे प्रमाण पत्र, भारतीय नोंदणी अधिनियम-१९०८ अन्वये योग्य रितीने नोंदलेले असले पाहिजे " अशी तरतुद आहे, त्या अर्थी शासनाकडून सदरील हस्तांतरण प्रमाणपत्र नोंदणीचे काम अपेक्षीत आहे. सबब हस्तांतरण प्रमाण पत्र नोंदणीचे वेळी संबंधीत खातेदार हजर राहण्याचा प्रश्न उदभवत नाही.

४/- परिच्छेद-१ मधील मुददा क्र.(३) ची पुर्तता संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी केलेलीच आहे. कारण हस्तांतरण प्रमाण पत्र हे द्विप्रतीत तयार करणेची कार्यपध्दती प्रचलीत आहे.

५/- नोंदणी विभागाने, दस्त नोंदणीसाठी जे सॉफ्टवेअर विकसीत केले आहे, त्यामध्ये हस्तांतरण प्रमाणपत्राचे बाबतीत दस्त हाताळणी शुल्क रु.२०/- ची पुर्तता करता येईल आणि खातेदार उपस्थितीची पूर्तता "आवश्यक नाही " किंवा "सुट देण्यात आली आहे " असे टॅब करुन करता येईल. म्हणजेच प्रत्येक दुय्यम निबंधकाकडे उपलब्ध असलेले सॉफ्टवेअर, प्रस्तूतचे हस्तांतरण प्रमाणपत्र नोंदणीसाठी स्वीकृत करु शकते व त्यामध्ये कोणत्याही तांत्रिक अडचणी उदभवणार नाहीत. त्यामुळे सर्व संबंधीत तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,यांनी त्यांचेकडील नोंदणीसाठी प्रलंबीत असलेली हस्तांतरण प्रमाण पत्रे नोंदणीकृत करुन घेऊन, त्याचा अहवाल दरमहाचे मासीक सभेमध्ये संबंधीत अधिक्षक भूमि अभिलेख / उपसंचालक भूमि अभिलेख यांचेकडे सादर करावा. तसेच संबंधीत उपसंचालक भूमि अभिलेख यांनी त्यांचे विभागाचा एकत्रीत अहवाल, या कार्यालयाचे मासीक सभेचे वेळी खालील विहीत नमुन्यात सादर करावा.

<u>प्रपत्र</u> - हस्तांतरण प्रमाणपत्र नोंदणे बाबतचा तपशिल माहे. ..

| अ. क्र. | अ.भू.अ. | नोंदणी करावयाच्या हस्तांतरण प्रमाणपत्रांची संख्या | | नोंदणी झालेल्या हस्तांतरण प्रमाणपत्रांची संख्या | | नोंदणी करणेवर शिल्लक हस्तांतरण प्रमाणपत्रांची संख्या | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३अ) | (३ब) | (४अ) | (४ब ) | (५अ) | (५ब) | (६) |
| | | गांवे | हस्तांतरण प्रमाणपत्रे | गांवे | हस्तांतरण प्रमाणपत्रे | गांवे | हस्तांतरण प्रमाणपत्रे | |
| | | | | | | | | |

2८३
२८३
२४४



६/- तसेच एकत्रीकरण योजनेनंतर, ज्या गांवांतील खात्यामध्ये दुरुस्ती योजना मंजूर करण्यास आलेली आहे, त्या खातेदारांना सुध्दा सुधारीत हस्तांतरण प्रमाण पत्रे देण्याची कार्यवाही करावी. म्हणजे दुरुस्त योजनेचे बाबतीत अनुसरण कामाची पूर्तता होईल.

७/- वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. ती न झाल्याचे निदर्शनास आल्यास, कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरुन त्यांचेविरुध्द नियमांतर्गत कारवाई करणेत येईल.

स्वाक्षरी /- XXXX
( डॉ. नितीन करीर )
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, (महाराष्ट्र राज्य) पुणे

प्रत /- उपसंचालक भूमि अभिलेख (सर्व)

प्रत /- अधिक्षक भूमि अभिलेख (सर्व)
२/- आपले अधिनस्त तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,यांचेकडे सदर परिपत्रकाच्या प्रती पाठवून तसे इकडे ज्ञात करावे.

प्रत /-. उपसंचालक भूमि अभिलेख,संलग्न जमाबंदी आयुक्त,भूमापन /नगर भूमापन/ /एकत्रीकरण/यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.

प्रत /- नोंदणी उप महानिरीक्षक (सर्व)

प्रत /-जिल्हा सह निबंधक (सर्व)
२/- आपले अधिनस्त दुय्यम निबंधक यांचेकडे सदर परिपत्रकाच्या प्रती आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठवाव्यात व तसे इकडे ज्ञात करावे.

प्रत /- कार्यासन अधिकारी (एकत्रीकरण) १,२ व ३ यांना माहितीसाठी रवाना.

**" निर्गमित "**

( एल.एम.आमोदे )
उपसंचालक भूमि अभिलेख,संलग्न
जमाबंदी आयुक्त (एकत्रीकरण)पुणे